Conclusion

प्रबंधाचा सारांश.

प्रकरण १ लें.

'मराठी वाङ्मयातील आधुनिक आत्मचरित्राचे समीक्षण' हा विषय प्रबंधासाठी का निवडला हें सुरुवातीस सांगितलें आहे. त्या नंतर आधुनिक मराठी वाङ्मयाला सुरुवात केव्हा झाली याचा ओझरता उल्लेख केला आहे. कारण आत्मचरित्रें हाही आधुनिक वाङ्मय प्रकार आहे हें सर्व विव्दानांनी मान्य केलें आहे. मग आत्मचरित्रांचा हेतु कोणता या विषयी चर्चा करणे हें ओघानेच प्राप्त झालें. कारण आत्मचरित्रकार कां लिहितो हें जोंवर आपण पाहणार नाही तोंवर उत्कृष्ट आत्मचरित्र कोणास म्हणावें व कां म्हणावें आणि निकृष्ट आत्मचरित्र कोणतें व तें तसें कां आहे हें आपणास ठरविता येणार नाही. म्हणून आत्मचरित्रकारांनीच जे अधून मधून 'आपण आत्मचरित्र कां लिहिलें' या विषयी सांगितलें आहे त्याची दखल घेऊन त्यावरून उत्कृष्ट आत्मचरित्रात कोण कोणत्या गोष्टी असल्या पाहिजेत या विषयी सामान्य सिद्धांत प्रथम नक्की केले. त्यावरून असें प्रत्ययास आलें की १. सत्यदर्शन, २. आत्मदर्शन, ३. सरळ सोपी आणि सुंदर भाषा, या गोष्टी आत्मचरित्रात असल्या पाहिजेत. तसेंच १. आत्मप्रौढी, २. आपपर भाव आणि ३. अतिशयोक्ती या गोष्टी आत्मचरित्रात असू नयेत. मग प्रश्न असा उदभवतो कीं आत्मचरित्र लिहूंच नये कीं काय ? कारण आत्मचरित्र लिहिणें म्हणजे तारेवरील कसरत करण्या सारखेंच होय. परंतु आत्मचरित्रात काय असावें आणि काय असू नये हें पाहून घाबरण्याचें कारण नाहीं. आत्मचरित्रकाराजवळ शालीनता असेल तर त्याला या सर्व गोष्टी आपोआप साधतील हें संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या उदाहरणा वरून आणि आधुनिक मराठी वाङ्मयातील काही आत्मचरित्रावरून दाखवून दिलें आहे. जसें लक्ष्मीबाई

टिळक यांचीं 'स्मृति चित्रें ', पद्मभूषण डॉक्टर धोंडो केशव उर्फ अण्णासाहेब कर्वे यांचें ' आत्मवृत्त ' इत्यादी.

यानंतर आत्मचरित्रांची साधनें कोण कोणतीं आहेत या विषयी चर्चा केली. कारण प्रत्येक कलेला काहींनकाही साधनांची आवश्यकता असते. जसें चित्रकाराला रंग, कागद, कुंचला यांची आवश्यकता असते. तशीच आत्मचरित्रकारालाही काही गोष्टींची आवश्यकता असते. कारण लेखनकला ही जर एक कला आहे तर ' आत्मचरित्र लेखन ' हीही एक कला आहे यांत संशय नाही. याच प्रमाणें आत्मचरित्रकार हा विव्दान् असावा की नसावा इकडे वाचकांचें लक्ष वेधलें, आणि त्यावरून असा निष्कर्ष काढला की आत्मचरित्रकार विव्दान् असेल तर दुधांत साखर पडली. परंतु तो विव्दान् असून शालीन नसेल तर त्याने आत्मचरित्र लिहिण्याचा खटाटोप न केलेला बरा. आपल्या मराठींतील आत्मचरित्रांत उत्कृष्ट उतरलेलीं आत्मचरित्रें लिहिणाया लेखिका विव्दान् होत्या असें नाही. म्हणजे आत्मचरित्रकार विव्दान् असेल तर ठीकच पण नसला तरी जर त्याला सांगण्याची तळमळ असेल नि सत्य घटनाच निःपक्षपातीपणाने सांगायच्या असा जर त्याने निर्धार केला असेल तर त्याचें आत्मचरित्रही वाचनीय होईलच होईल हें दाखवून दिलें आहे.

या नंतर आत्मचरित्राला सुरुवात केव्हा करावी, आठवणींचा आत्मचरित्रांत समावेश करावा किंवा नाही, आणि आत्मचरित्रपर वर्णन असलेल्या आणखी काही पुस्तकांना आत्मवृत्त म्हणावें किंवा नाही याची मुद्यांचा विस्तार या ठिकाणीं केलेला आहे.

प्रो. ना. सी. फडके यांनी आत्मचरित्र केव्हा लिहावें, या विषयी आपलें मत मांडलें आहे. त्यांच्या विचारांची छाननी करून त्यावरून कोणता निष्कर्ष निघतो हेही सांगितलें आहे. प्रो. ना.सी.फडके यांचें म्हणणें असें की आत्मचरित्र उतारवयांत लिहिण्या ऐवजी तारुण्य ओसरण्या पूर्वीच लिहिलें तर तें अधिक सरस ठरेल. कारण त्यावेळीं आपल्या अनुभवांच्या उर्मी

ताज्या असतात आणि त्या बद्दलची आपली भावना तीव्र असते. परंतु आत्म चरित्रांच्या अवलोकनावरून असें दिसतें की आत्मचरित्र केव्हा लिहावें तर ज्यावेळीं आपल्याला तें सांगायची तीव्र इच्छा असेल तेव्हा. मग वय कोणतेही असले तरी हरकत नाही. याला पुरावा म्हणून आपल्या मराठींतील उत्कृष्ट आत्मचरित्रांचा नामनिर्देश केला आहे. कारण तीं आत्मचरित्रें लेखक लेखिकांनी उतार वयात लिहिलीं तरी सांगण्याची तळमळ व सचोटी असल्यामुळे तीं उत्कृष्ट उतरलीं आहेत.

प्रकरण २ रें.

प्राचीन वाङ्मयातील आत्मचरित्रपर उल्लेख.

संस्कृत आणि प्राचीन मराठी वाङ्मयात आत्मचरित्रपर उल्लेख मधून मधून आलेले आहेत. त्यांचाही थोडक्यात आढावा घेणें आवश्यक होतें. जसें .... '' बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तवचार्जुन ।

तान्यहं वेद सर्वाणि नत्वं वेत्थ परंतप ॥ ''

म्हणजे ' हे अर्जुना, तू आणि मी आता पर्यंत अनेक वेळा जन्माला आलों आहोंत. ते सर्व जन्म तुला आठवत नाहीत, परंतु मला मात्र आठवतात. '

या प्रमाणें संत ज्ञानेश्वर महाराज, संत नामदेव महाराज, संत एकनाथ महाराज, संत तुकाराम महाराज, संत बहिणाबाई आणि श्रीसमर्थ रामदासस्वामी यांच्या वाङ्मयातून आलेले आत्मचरित्रपर उल्लेख येथे थोडे दिले आहेत. हें दाखविण्याचें कारण असें की या संतांच्या वाङ्मयाचा जनमनावर फार खोलवर परिणाम झालेला आहे. या संतांच्या अभंगवाणी मुळें आजही खेड्यापाड्यातले हजारो नव्हे लाखो लोक परमार्थपर पावन विचारात पुनः पुनः तल्लीन होत आहेत. एवढेंच नव्हे तर न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे,

धर्मानंद कोसंबी, संत वाङ्‌मयाचे गाढे मर्मज्ञ लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांच्या जीवनावर या संतांच्या अभंगांचा फार मोठा परिणाम झालेला आहे हें त्यांच्याच आत्मचरित्रावरून व्यक्त होतें. या कारणास्तव प्राचीन मराठी वाङ्‌मयातील आत्मचरित्रपर उल्लेख थोडेसे का होईनात पण येथे देण्याचा नम्र प्रयत्न केलेला आहे.

प्रकरण ३ रें.

आधुनिक आत्मचरित्रांचा परिचय.

या प्रकरणात आधुनिक आत्मचरित्रांचा परिचय करून देतांना मी फक्त वाटाड्याचे काम केलें आहे. कारण अजिंठा येथील लेणी जशीच्या तशी पाहण्यांत जिज्ञासू लोकांची तृप्ती होते. कारण त्यामुळे 'हीं लेणीं कशी होतीं ' याची त्यांना थोडीफार जाणीव होऊं शकते. हीं लेणीं दाखविणाऱ्याने जिज्ञासू वाचकांनी विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें द्यावीत म्हणजे पुरे. असाच प्रयत्न या ठिकाणी केला आहे. कारण त्यामुळें आपल्या जीवनाचें चित्र खुद्द आत्मचरित्रकाराने कसें रेखाटलें आहे हें वाचकांना पाहता येणार आहे. कारण प्रत्येक आत्मचरित्रकार हा वेगळा, त्यानें अनुभविलेले प्रसंग वेगळे, त्याला आलेल्या अडचणी वेगळ्या, त्यांतून उडालेल्या ठिणग्या वेगळ्या, एकीकडे ध्येय आणि एकीकडे भोंवतालची परिस्थिती यांच्या विरोधामुळे त्याच्या जीवाची जी लाही लाही झाली ती वेगळी, अशाही परिस्थितींत ज्यांनी मदतीचा हात दिला त्या व्यक्ती वेगळ्या, प्रगती पथावरून पुढे पुढे गेल्यावर विजयश्रीने जेव्हां गळ्यात माळ घातली तो प्रसंग वेगळा, त्या वेळीं अंतःकरणात ज्या आनंदाच्या ऊर्मी उठल्या त्या वेगळ्या आणि म्हणूनच त्या आत्मचरित्रकाराने सादर केलेली माहितीही वेगळीच. यास्तव त्या आत्म चरित्रकारांनाच त्यांच्या स्वतःविषयी बोलू दिलेलें इष्ट नाही का ?

असें असलें तरीही त्या प्रत्येक आत्मचरित्राबद्दल माझें मतही शेवटी मी मुद्दाम व्यक्त केलें आहे. कारण सर्व आत्मचरित्रांचा साकल्याने विचार केल्यानंतर असें मत सांगणें आवश्यक आहे असें मला वाटतें.

प्रकरण ४ थें.

आत्मचरित्रांतून घडणारें समाजदर्शन.

आधुनिक आत्मचरित्रांची पृष्ठसंख्या कित्येक हजार आहेत. त्या सर्वांतून मधून मधून राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक अशी कितीतरी महत्वाची माहिती आलेली आहे. ज्या प्रमाणें कोळशाच्या खाणींत मधून मधून हिरे दडलेले असतात, त्यांना कोणी मुद्दाम हुडकून काढल्या शिवाय ते हातीं लागत नाहीत, त्या प्रमाणें ही माहिती या ठिकाणीं मुद्दाम शोधून, टिपून घेऊन मी समर्पक पध्दतीने सादर केली आहे. हेतु हा की आजच्या आपल्या समाजांत काही सुधारणा घडवून आणायच्या असतील तर आत्मचरित्रांतून त्या संबंधाने आलेली माहिती आपण मुद्दाम पाहिली पाहिजे. कारण आज काही सुधारणा करायच्या तर आपण कालचा दिवस कसा घालविला याचा ओझरता तरी आढावा घेतोच की नाही ! तसेंच हें आहे.

प्रकरण ५ वें.

आत्मचरित्रकारांचे देव आणि दैव या विषयी विचार.

या भूतलावर मनुष्य आल्या पासून हें जग, हें विश्व, याचा कर्ता आणि आपण स्वतः या विषयीं त्याच्या मनांत अनंत विचार आलेले आहेत. कोणी म्हणतात देव आहे तर कोणी म्हणतात की देव नाही. म्हणून या विषयी

वाचकांनाही कुतुहल असणें साहजीकच आहे. या करितां देव आणि दैव या विषयींचे आत्मचरित्रकारांचे विचार येथे मुद्दाम सादर केलेले आहेत. त्यावरून ज्याला जो बोध घ्यावयाचा असेल तो त्याने घ्यावा.

प्रकरण ६ वें.

आत्मचरित्रकारांच्या अनुभवाचें सार.

'आत्मचरित्रकारांच्या अनुभवाचे सार' या प्रकरणांत त्यांच्या आयुष्याचें मर्म सांगितले आहे. कारण त्यांनी त्यांचें जीवन फलद्रूप कसें करून घेतलें हें जाणण्याची आपणा सर्वांची इच्छा असते. कारण असें की आपणास ' आपलेंही जीवन चांगल्या तऱ्हेने जावें ' असें वाटते. अशा वेळीं पुढच्यास ठेच मागचा शहाणा. तेव्हां आत्मचरित्रकारांनी लिहून ठेवलेले त्यांच्या अनुभवाचे बोल हें आपलें फार मोठें धन आहे. त्याची महती सांगावी तेवढी थोडीच आहे. आत्मचरित्रकारांच्या अनुभवाचें सार वाचून त्यांतून कांहींनकांही तरी आपण शिकावें असा विचार वाचकांच्या मनांत येईल असा मला भरंवसा वाटतो.

प्रकरण ७ वें.

अन्य भाषेंतील आत्मचरित्रें.

आधुनिक आत्मचरित्रांचा परिचय करून घेतल्या नंतर भाषांतरींत आत्मचरित्राबद्दल थोडेसें लिहिणें अनुचित होणार नाही. कारण मराठींत आत्मचरित्रें लिहिलेल्यांनी पाश्चिमात्य वाङ्मयांतील आत्मचरित्रें वाचल्याचा उल्लेख केलेला आहे. त्यांतल्या त्यांत साहित्यसम्राट नरसिंह चिंतामण केळकर यांनी उपलब्ध झालीं तेवढी बहुतेक आत्मचरित्रें वाचलीं होतीं, असें म्हटलें आहे.

Conclusion

तेंव्हां अन्य भाषेंतून जीं आत्मचरित्रें मराठींत आलीं त्यांचाही उल्लेख करणें, तसेंच इतर भाषेंत जीं उत्कृष्ट आत्मचरित्रें आहेत त्यांचा नामनिर्देश करणें या गोष्टी आवश्यकच होत्या.

महात्मा गांधी यांचे मूळचें गुजराथींत असलेलें आत्मचरित्र 'सत्यना प्रयोगो' याचें मराठींत भाषांतर झालेलें आहे. हें आत्मचरित्र उत्कृष्ट कसें आहे या बद्दलची चर्चा इतरत्र केली असल्यानें या ठिकाणीं या आत्मचरित्राची फक्त ओझरती तोंडओळख करून देण्यांत आली आहे.

या प्रकरणांत शेवटी इंग्रजी, हिंदी, गुजराथी, कानडी, मल्याळी, आणि उर्दू भाषेतील कांही आत्मचरित्रांची यादी सादर केली आहे. तिचा जिज्ञासू वाचकांना आणि आत्मचरित्र वाङ्मयाबद्दल अधिक अभ्यास करूं इच्छिणारांना उपयोग होईल असें मला वाटतें.

प्रकरण ८ वें.

उ प सं हा र.

या प्रकरणाच्या सुरूवातीस आता पर्यंत आलेल्या प्रकरणांचें विहंगमावलोकन केलें आहे. हें करण्याचा हेतू असा की आतापर्यंत आपण आत्मचरित्र वाङ्मयांतून काय काय अवलोकन केलें हें वाचकांच्या ध्यानांत यावें. नंतर या आत्मचरित्र वाङ्मयाच्या अभ्यासानें कोण कोणते विचार वेळोवेळीं आढळले ते एकापुढे एक मांडून दाखविले आहेत.

सर्वांत प्रथम दिसून येणारा मुद्दा असा की आपल्या देशांतील लोकांना अज्ञानामुळें फार हाल अपेष्टांत जीवन कंठावें लागलें आणि अजूनही कंठावें लागत आहे. यास्तव अनेक आत्मचरित्रकारांनी अज्ञानाचे दुष्परिणाम मोठ्या कळवळ्यानें सांगितले आहेत. ते त्यांच्याच शब्दांत सांगायचें म्हटलें तर शें दीडशें पृष्ठें सहज लागतील. म्हणून मी माझ्याच शब्दांत पण थोडक्यांत सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

आत्मचरित्रांच्या अवलोकनावरून उपयुक्त असा सुचलेला दुसरा मुद्दा असा की आपल्या देशात कार्यकर्त्यांची परंपरा निर्माण झाली पाहिजे. सर्वांच्या हितांत माझें हित आहे ही सामाजिक दृष्टि जोंवर आपल्या आंगवळणी पडणार नाहीं तोंवर समाजाचें उत्थान होणार नाहीं. हा विचार जरा सूक्ष्म असा आहे. परंतु तो आपणाला आता व्यवहारांत म्हणजे उठता बसता वागणूकींत उतरविलाच पाहिजे. कारण त्या शिवाय आपल्या समाजाचें म्हणजे आपणही त्यांत आलोंच कल्याण होणार नाहीं.

आत्मचरित्रांच्या अभ्यासाने सुचणारा उपयुक्त असा तिसरा मुद्दा हा की आपल्या समाजांत आपण समता स्थापन करण्याचा प्रयत्न करायला हवा. कोणी काय करावें हें ज्याने त्यानें ठरवावें. परंतु समता नसल्यानें हजारो व्यक्तींच्या जीवनाची मोठी कुचंबणा होत आहे आणि त्या मुळें त्यांना प्रोत्साहन मिळत नाहीं. आपणा सर्वांच्या मनांत ' आपण सर्व जण बंधु आहोंत ' आणि ज्ञानेश्वरांच्या शब्दांत सांगायचें तर ' सारें विश्वची माझें घर ' अशी भावना दृढ झाली पाहिजे. आपल्या समाजांतील सर्वांच्या कल्याणांत आपलेंही कल्याण आहे आणि या साठीं समतेची वागणूक सर्वांना मिळाली पाहिजे असा विचार प्रथम आपल्या अंतःकरणांत थबथबला तर तशी वागणूक आपल्या हातून खचित होईल.

आत्मचरित्रांच्या अभ्यासानें सुचणारा चवथा मुद्दा असा की आपणा सर्वांच्या ठिकाणी सार्वजनिक नीतिमत्तेची जाणीव रुजली पाहिजे. या बाबत समाजहितकर्ते श्री. नारायण गोविंद चाफेकर यांचे विचार मोठे मननीय आहेत. आपल्या पैकी आपण पुष्कळ जण वैयक्तिकरित्या चांगले आहोंत परंतु सामाजिक रित्या आपणांत फार अवगुण आहेत. हे जोंवर आपण घालविणार नाहीं तोंवर आपली व्हावी तेवढी प्रगति होणार नाहीं. ही गोष्ट पाश्चिमात्य राष्ट्रा कडून आपण खरोखर शिकण्या सारखी आहे.

आत्मचरित्रांच्या अभ्यासाने सुचणारा पुढचा मुद्दा असा की आपण प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. रामदास स्वामींनी तर 'यत्न तो देव

जाणावा ' असें स्पष्ट सांगितलें आहे. असाध्य तें साध्य करिता सायास. कारण अभ्यास तुका म्हणे. हे तुकाराम महाराजांचे स्वानुभवाचे बोल लक्षांत ठेवण्या सारखे आहेत. ज्या राष्ट्रांतले लोक आळशी आहेत, वेळ क्षातरी घालवीत आहेत, एकमेकांचे हेवेदावे करण्यांत फुशारकी मारीत आहेत अशा राष्ट्राची उन्नति होईल काय ? याच कारणा मुळें आपणाला दुसऱ्याच्या डोळ्यांतलें कुसळ दिसतें पण स्वतःच्या डोळ्यांतलें मुसळ दिसत नाहीं.

आत्मचरित्रांच्या अभ्यासामुळें सुचणारा सहावा मुद्दा असा कीं, ' आपल्याला काय करायचें आहे! ' ही उदासीन वृत्ति आपण टाकून दिली पाहिजे. प्रत्येकाने जर असेंच म्हटलें नि प्रत्येकजण जर असेंच वागूं लागला तर स्वातंत्र्याचीं फळें सर्वांना चाखायला मिळतील काय ? आपल्या देशांत समता स्थापन होईल काय ? आपणाला मोठ्या मानानें आणि आनंदाने जगता येईल काय ? याचा जाणत्यांनि सुज्ञ वाचकांनीं अवश्य विचार करावा. माझी पत्नि, माझी मुलें नि माझें घर एवढाच विचार जर आपण आपल्या मनांत ठेवला तर सामाजिक ओढ आपणाला लागणार नाही, म्हणजे आपण सुखानें संसार करूं नये असें म्हणणें नाहीं. परंतु प्रपंच करता करता काही समाजहितही करीत असावे म्हणजे सर्वांनी थोडें थोडें जरी समाजहित केलें तरी सर्वांचें मिळून कितीतरी उपयुक्त कार्य होईल. थेंबें थेंबें तळें साचें म्हणतात तें एवढ्यासाठींच.

आत्मचरित्रांच्या अभ्यासामुळें लक्षांत भरणारा सातवा मुद्दा असा की आपणा सर्वांच्या ठिकाणीं कार्याची निष्ठा बाळगली पाहिजे. निष्ठा म्हणजेच श्रद्धा. ' तुकोबाही ' भाव धरील त्या तारतील पाषाण, शहाणे मरती तरीनाही ' असेंच सांगतात. आपण जें कार्य करतों त्यांत आपलें मन पाहिजे. केवळ वरवर दिखाऊपणासाठीं केलेल्या कार्यानें आपली वैयक्तीक अगर सामाजिक उन्नति होऊं शकणार नाही. केवळ निष्ठा होती म्हणून साहित्यलक्ष्मी ' लक्ष्मीबाई टिळक ' यांनी उतार वयांतही हजारो पृष्ठांची ' स्मृतिचित्रें ' आपणा सर्वांना सादर केलीं. निष्ठे मुळे मनुष्याच्या सर्व

शारीरिक, मानसिक आणि अध्यात्मिक शक्ति एकवटून काम करू लागतात. म्हणजे मग मनुष्याला अंधारातूनही वाट दिसू लागते. त्यामुळें तो स्वतःची तर प्रगति करून घेऊ शकतोच पण समाजालाही सन्मार्ग दाखवू शकतो.

आत्मचरित्राच्या अवलोकनावरून प्रत्ययास येणारा पुढील मुद्दा असा की आपणा सर्वांच्या प्रगतिसाठीं आपणात राष्ट्रीय चारित्र्याची निर्मिती झाली पाहिजे. आपल्या देशात शंभर वर्षा पूर्वीही लाच लुचपत करणारे लोक होते असें आत्मचरित्रांतील वर्णनावरून आढळतें. तेव्हां निदान आतां कित्येक शतकानंतर आपल्या एवढ्या मोठ्या देशाला स्वातंत्र्य मिळालें आहे. आतातरी आपणास राष्ट्राविषयी तळमळ, राष्ट्राविषयी मोठे विचार, राष्ट्राविषयी कराव्याचा त्याग आणि राष्ट्रसेवा करणें हीच माणूसकी ही भावना फोफावली पाहिजे. जोंवर आपण मोठ्या विचाराने प्रेरित होऊन उद्योगाला लागणार नाही तोंवर आपल्या हातून मोठें कार्य होणार नाही हें आपण लक्षांत असू द्यावें.

ज्याला आपण माणूसकी माणूसकी म्हणून म्हणतो ती हीच भावना होय. अशा तऱ्हेची विचार सरणी जर आपल्या आंगवळणीं पडली तर आपल्या बोलण्यात, आपल्या विचारांत आणि आपल्या वागणुकींत खात्रीनें माणूसकी दिसून येईल.

अशा तऱ्हेचे उच्च विचार स्फुरण पावण्यास या प्रबंधानें थोडी जरी मदत झाली तरी मी स्वतःला कृतार्थ समजेन.

* * *